महाराष्ट्र शासन
# बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) जिल्हा लातूर
त्रिमुर्ती भवन, उदय पेट्रोल पंप जवळ,बार्शी रोड, लातूर-413512
Email - cdpolaturu@gmailcom

जाक्र.बाविप्रअ ना. (जि) लातूर/आस्था/जाहिरात/2025-26/ दिनांक 09.04.2025

**प्रति,**
मा. संचालक,
जिल्हा सुचना व विज्ञान अधिकारी (NIC)
जिल्हाधिकारी कार्यालय लातूर.

**विषय :- अंगणवाडी मदतनीस (मानधनी) भरती 2025 सुचना प्रसिध्द करणे बाबत.**

**महोदय,**

वरील विषयान्वये सविनय सादर करण्यांत येते की, महिला व बाल विकास विभागाचे एकात्मिक बाल विकास सेवा योजना अंतर्गत बाल विकास प्रकल्प अधिकारी, नागरी जिल्हा लातूर या कार्यालयाचे अधिनस्त अंगणवाडी मदतनीसांचे रिक्त पदे भरणे बाबत शासन निर्देश प्राप्त झाले आहेत.

त्यानुसार अंगणवाडी मदतनीस यांचे रिक्त पदे भरणे बाबत जाहिरात, सुचना व शैक्षणिक पात्रता, अटी व शर्ती आणि अर्जाचे विहित नमुना याबाबत व्यापक प्रसिध्दीच्या उददेशाने सदरील जाहिरात सुचना आपणाकडील http://latur.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी हि विनंती आहे.

संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्दीचा दिनांक.16.04.2025 आणि जाहिरातीनुसार कार्यालयात अर्ज स्विकारण्याचा अंतिम कालावधी हा जाहिरातीचे दिनांकापासुन पुढिल 10 कार्यालयीन दिवस म्हणजेच दिनांक.30.04.2025 पर्यंत सायंकाळी 05.00 पर्यंत असा आहे.

आपला विश्वासू

(बळीराम शिंपाणीकर)
बाल विकास प्रकल्प अधिकारी
(नागरी ) जिल्हा लातूर

**सोबत :**

१. शैक्षणिक पात्रता आणि अटी व शर्तीचे माहितीपत्रक.
२. अर्जाचा विहित नमूना.

**प्रत** : मा. आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

**महाराष्ट्र शासन**
**महिला व बाल विकास विभाग**
**ए.बा.वि.से.यो.नागरी प्रकल्प जिल्हा लातूर**
**अंगणवाडी मदतनीस मानधनी पद भरती जाहिरात**

महाराष्ट्र शासन महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्रमांक-एबावि-२०२२/ प्रक्र.९४/ का.६ दि. ०२.०२.२०२३ व दिनांक ३०.०१.२०२५ नुसार एकात्मिक बाल विकास सेवा योजना, या केंद्र पुरस्कृत योजने अंतर्गत बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) जिल्हा लातूर या कार्यालया अंतर्गत लातूर जिल्हयातील अहमदपुर,जळकोट,निलंगा,देवणी, शिरुर अनंतपाळ,रेणापुर नगर परिषद/ नगरपंचायत अंतर्गत कार्यरत अंगणवाडी केंद्रातील एकुण मदतनीस ०६ यांच्या पदभरती बाबत अर्जाचा नमुना, अटी व शर्ती कार्यालयाच्या नोटिस बोर्डवर व लातूर जिल्हयाचे अधिकृत संकेतस्थळ http://latur.gov.in वर उपलब्ध आहे.

अर्ज स्विकारण्याचा कालावधी दिनांक.१६.०४.२०२५ ते दिनांक.३०.०४.२०२५ सायंकाळी ०५.०० वाजेपर्यत
(कार्यालयीन वेळेत सुटटीचे दिवस वगळून)

**अर्ज मिळण्याचे व स्विकारण्याचे स्थळ : बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) जिल्हा लातूर, त्रिमुर्ती भवन, उदय पेट्रोलपंप जवळ, बॅंक ऑफ इंडियाच्या वर पहिला मजला, बार्शी रोड लातूर-४१३५१२**

बाल विकास प्रकल्प अधिकारी
(नागरी ) जिल्हा लातूर

# अंगणवाडी मदतनीस पदभरती जाहिरात

## कार्यालय-बाल विकास प्रकल्प अधिकारी, नागरी जिल्हा लातूर

## पत्ता - त्रिमुर्ती भवन, पहिला मजला, उदय पेट्रोलपंप जवळ, बार्शी रोड लातूर

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) जिल्हा लातूर या प्रकल्प कार्यक्षेत्रांतर्गत खाली नमुद केलेल्या 06 मदतनीस यांचे रिक्त पदांची भरती प्रक्रिया सन 2025 साठी (लातूर शहर वगळुन) लातूर जिल्हयातील नगरपरिषद / नगरपंचायत शहरी क्षेत्रातील अंगणवाडी मदतनीस या रिक्त मानधनी तत्वावरील पदांसाठी एकत्रित मानधन तत्वावर महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्रमांक-एबावि-2022/प्रक्र 94/का.6 दिनांक 02.02.2023 व शासन निर्णय क्रमांक-एबावि-2022/प्रक्र 94/का.6 दिनांक 11.08.2023 व महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्रमांक-एबावि-2022/प्रक्र 94/का.6 दिनांक 30.01.2025 मधिल तरतुदीनुसार निवडीसाठी सरळ नियुक्तीने (By Nomination) खालील अटी व शर्तीनुसार विहित नमुन्यात पात्र स्थानिक महिला उमेदवाराकडून दि. 16.04.2025 ते दि. 30.04.2025 या कालावाधीत (सुटटीचे दिवस वगळुन) विहित नमुन्यातील परिपुर्ण अर्ज कार्यालयीन वेळेत मागविण्यांत येत आहेत.

**मदतनीस रिक्त पदांची माहिती खालील प्रमाणे आहे.**

| अक्र | लातूर जिल्हयातील नागरी प्रकल्प कार्यक्षेत्रातील शहराचे नांव | अंगणवाडी मदतनीस रिक्त पद संख्या | रिक्त पद असलेले अंगणवाडी क्रमांक | शेरा |
|---|---|---|---|---|
| 1 | नगर परिषद निलंगा | 01 | 27524020220 | -- |
| 2 | नगर पंचायत देवणी | 01 | 27524020217 | -- |
| 3 | नगर पंचायेत जळकोट | 01 | 27524020503 | -- |
| 4 | नगर परिषद अहमदपुर | 01 | 27524020518 | -- |
| 5 | नगर पंचायत शिरुर अनंतपाळ | 01 | 27524020603 | -- |
| 6 | नगर पंचायत रेणापुर | 01 | 27524020322 | -- |
| | एकुण पदे | 06 | 06 | |

**अटी व शर्ती**

| | | |
|---|---|---|
| 1 | शैक्षणिक पात्रता | अंगणवाडी मदतनीस पदासाठी उमेदवार किमान 12 वी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. इयत्ता बारावीचे गुणपत्रकाची सत्यप्रत आवश्यक असुन सदरील गुणपत्रक नसल्यास अर्ज अपात्र ठरविण्यांत येईल. यापेक्षा उच्चत्तम शैक्षणिक अर्हता धारण करणा-या उमेदवाराने आवश्यक शैक्षणिक कागदपत्रांच्या सत्यप्रती / स्वयंसाक्षांकित प्रती अर्जासोबत जोडाव्यात. |
| 2 | वास्तव्याची अट / स्थानिक रहिवाशीची अट | महिला उमेदवार या संबंधित नगर परिषद क्षेत्र निलंगा, देवणी, जळकोट,अहमदपुर,रेणापुर आणि शिरुर अनंतपाळ या नागरी क्षेत्रातीलच / न.प. हददीतील रहिवाशी असणे आवश्यक आहे. अर्जासोबत सक्षम प्राधिकारी तहसिलदार यांनी दिलेले रहिवाशी प्रमाणपत्र सोबत जोडावे. (न.प. अध्यक्ष, नगर सेवक यांचे रहिवाशी प्रमाणपत्र गृहित धरले जाणार नाहीत. तसेच, आधारकार्ड, शिधापत्रिका रहिवाशी पुरावा म्हणुन ग्राहय धरले जाणार नाही.) उमेदवार विवाहित असल्यास रहिवाशी प्रमाणपत्र हे विवाह झाल्यानंतरच्या तारखेचे जोडावे. |
| 3 | वयाची अट | अंगणवाडी मदतनीस या पदासाठी वयोमर्यादा किमान 18 वर्ष व कमाल 35 वर्ष राहील. तथापि विधवा उमेदवारासाठी कमाल वयोमर्यादा 40 वर्ष राहील. वयाचा पुरावा म्हणुन शाळा सोडल्याचा दाखला (टि.सी) किंवा एस.एस.सी.बोर्डाचे प्रमाणपत्र किंवा जन्म दाखल्याची सत्यप्रत जोडणे आवश्यक राहिल. उमदवाराचे किमान व कमाल वय हे अर्ज स्विकारण्याच्या अंतिम दिनांकास गणना करण्यांत येईल. |

Child Development Project Officer
Urban (Dist) Latur

| | | |
|---|---|---|
| 4 | लहान कुटूंब प्रतिज्ञापत्र | वरील पदासाठी अर्ज करणा-या उमेदवारास लहान कुटुंबाची अट लागू राहील. लहान कुटूंब याचा अर्थ उमेदवारास जास्तीत जास्त दोन हयात अपत्य असा राहील. उमेदवारास दोनपेक्षा जास्त हयात अपत्य (दत्तक दिलेल्या अपत्यासह) नसावीत. अर्जासोबत दिलेल्या नमुन्यात लहान कुटुंबाबाबतचे प्रतिज्ञापत्र जोडणे आवश्यक राहिल. अन्यथा अर्ज अपात्र ठरविण्यांत येईल. उमेदवाराला दोन हयात अपत्यापेक्षा (दत्तक दिलेल्या अपत्यासह) अधिक अपत्य असल्यास उमेदवार नियुक्तीसाठी पात्र ठरणार नाही. जर सदर बाब नियुक्तीनंतर निदर्शनास आल्यास उमेदवाराला सेवेतुन तात्काळ सेवामुक्त करण्यात येईल. तसेच सेवा कालावधीमध्ये त्यास दोन हयात अपत्य (दत्तक दिलेल्या अपत्यासह) असुन देखील तिसरे अपत्ये झाल्यास त्यांचा सेवा समाप्त करण्यांत येईल. |
| 5 | भाषेचे ज्ञान | अंगणवाडी मदतनीस चे पद ज्या अंगणवाडी केंद्रामध्ये रिक्त आहे अशा अंगणवाडी केंद्रामध्ये ज्या बोली भाषेच्या मुलांची संख्या 50% पेक्षा जास्त आहे. अशा अंगणवाडी मध्ये सदर भाषेचे ज्ञान असलेल्या महिला उमेदवारास नियुक्ती देण्यात येईल, तसेच या उमेदवाराने इयत्ता दहावी, बारावी, पदवी, पदव्युत्तर पदवी, डी.एड किवा बी.एड या शासन निर्णयातील परिशिष्ट अ मध्ये नमुद केलेल्या शैक्षणिक अर्हतेपैकी किमान एक अर्हता मराठी भाषा विषयासह उत्तीर्ण असणे आवश्यक राहिल. |
| 6 | उमेदवार विधवा असल्यास | नगरपालिका/नगरपरिषद/नगरपंचायत यांचेकडील किंवा सक्षम प्राधिकारी यांचेकडील पतीचे मृत्यु प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहिल. प्रमाणपत्र नाही जोडल्यास अतिरिक्त गुण दिले जाणार नाही. |
| 7 | उमेदवार अनाथ असल्यास | शासन निर्णयानुसार सक्षम प्राधिकारी / विभागीय उपआयुक्त, महिला व बाल विकास यांचे अनाथ प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे. प्रमाणपत्र नाही जोडल्यास अतिरिक्त गुण दिले जाणार नाही. |
| 8 | मागासवर्ग/ आर्थिक दृष्टया दुर्बल घटक उमेदवार असल्यास | मागासवर्गीय उमेदवार अनुसूचित जाती / अनु. जमाती / इतर मागास प्रवर्ग/ विमुक्त जाती/ भटक्या जमाती/ विशेष मागास प्रवर्ग/ आर्थिकदृष्टया दुर्बल घटक सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागास वर्ग असल्यास, सक्षम प्राधिकारी यांनी दिलेल्या स्वत:च्या नावाचे जातीचे प्रमाणपत्राचे सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे. सक्षम प्राधिकारी यांनी दिलेल्या जात प्रमाणपत्राची सत्यप्रत न जोडल्यास संबंधित प्रवर्गाचे अतिरिक्त गुण दिले जाणार नाहीत. जात प्रमाणपत्र मिळणे करिता तहसिल कार्यालयात अर्ज सादर केलेली पावती ग्राहय धरली जाणार नाही. |
| 9 | अनुभव | शासकिय यंत्रणेतील अंगणवाडी सेविका /मदतनीस या पदावर काम केल्याचाच अनुभव ग्राहय धरला जाईल. किमान **दोन** वर्षाचा अनुभव असल्यास सक्षम अधिका-याचे म्हणजेच संबंधीत बाल विकास प्रकल्प अधिकारी यांचे मुळ अनुभव प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. अंगणवाडी सेविका व मदतनीस या पदाव्यतिरिक्त मान्यताप्राप्त खाजगी व स्वंयसेवी संस्थेतील कामाचा अनुभव ग्राहय धरला जाणार नाही. उमेदवाराने याबाबत कोणताही युक्तीवाद केल्यास मान्य केले जाणार नाही. |
| 10 | बदली | अंगणवाडी कर्मचारी हे एकाकी पद असल्यामुळे तसेच ती स्थानिक रहिवाशी असावी या केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना विचारात घेता अंगणवाडी कर्मचा-यांना बदलीचे कोणतेही प्रावधान राहणार नाही. |
| 11 | अर्जासोबत जोडावयाचे प्रमाणपत्राची माहिती | उमेदवाराने अर्जासोबत जन्मतारखेचा पुरावा, किमान बारावी उत्तीर्ण शैक्षणिक प्रमाणपत्र सोबत जोडावे. मागासवर्गीय असल्यास जातीचे प्रमाणपत्र (स्वत:चे नावाचे), बारावी नंतर उच्च शैक्षणिक अर्हता असल्यास उदा. पदवीधर, पदव्युत्तर पदवी, डी. एड, बी. एड, एमएससीआयटी व इतर शैक्षणीक कागदपत्रे सोबत जोडावे. अनुभव, विधवा, अनाथ असल्यास सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र सोबत जोडावे. शहराचे नांव व पदाचे नांव नमुद केलेले नसणे, अर्ज अपूर्ण, अर्जामध्ये खाडा-खोड केलेले, विहित ठिकाणी स्वाक्षरी नसलेले तसेच अर्जासोबत आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या साक्षांकित / स्वयंसाक्षाकित प्रति नसणे इत्यादि कारणामुळे अर्ज अपात्र ठरविण्यांत येतील व त्याबावत उमेदवारास कळविण्यात येणार नाही. |
| 12 | निवड कार्यपध्दती | महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.एबावि-2022/प्रक्र.94/का.6 दिनांक 02.02.2023 व महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्रमांक-एबावि-2022/प्रक्र 94/का.6 दिनांक 30.01.2025 नुसार उमेदवारांनी अर्जासोबत सादर केलेल्या कागदपत्रांवरुन इयत्ता बारावी / पदवी / पदव्युत्तर / डीएड / बीएड / संगणक परिक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र यामध्ये त्यांना मिळालेल्या गुणांनुसार तसेच विधवा / अनाथ, जात प्रवर्ग, अनुभव, आर्थिकदृष्टया दुर्बल घटक इत्यादिसाठी त्यांचे प्रमाणपत्रावरुन मिळालेल्या एकुण गुणांनुसार गुणांनुक्रमाने पात्र उमेदवारांची शहरातील रिक्त पदांच्या संख्येनुसार निवड करण्यांत येईल. या पदांकरिता लेखी अथवा मौखिक मुलाखत घेतली जाणार नाही. अर्जासोबत जोडलेल्या प्रमाणपत्रांनुसार शासन निर्णयात नमुद केल्यानुसार उमेदवारांना गुण देऊन प्राथमिक गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्यांत येईल. त्यावर अर्ज करणा-या उमेदवारांना आक्षेप/तक्रार असल्यास अर्जदाराने प्राथमिक गुणवत्ता यादी प्रसिध्द झाल्यानंतर 10 दिवसाचे आत लेखी तक्रार बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) जिल्हा लातूर या कार्यालयात आवश्यक पुराव्यासह सादर करावे. सदर तक्रारीची शहानिशा करुन अंतिम गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्यांत येईल. अंतिम निवड झालेल्या उमेदवारांनाच निकालाबाबत कळविण्यांत येईल. ईतर उमेदवारांना कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. अंतिम निवड यादी जाहिर झाल्यानंतर गुणानुक्रमे मदतनीस यांची निवड करण्यांत येईल व गुणानुक्रमानुसार अंगणवाडी केंद्र देण्यांत येईल. निवड झालेल्या उमेदवारांना संबंधित क्षेत्रातील नियुक्ती दिलेल्याच अंगणवाडी केंद्रावर काम करावे लागेल. उमेदवाराची एकदा नियुक्ती झाल्यावर कोणत्याही परिस्थितीत त्यांची ईतर ठिकाणी बदली करता येणार नाही. तसेच त्यांचे निवासस्थानापासुन नियुक्ती देण्यांत आलेल्या ठिकाणापर्यत कोणताही प्रवासभत्ता अनुज्ञेय राहणार नाही. त्याचप्रमाणे नियुक्ती झालेल्या ठिकाणी सतत गैरहजर राहिल्यास त्यांची नियुक्ती खंडीत करण्यांत येईल. निवड |

Child Development Project Officer • Urban (Dist) Latur

| | | |
|---|---|---|
| | | प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात किंवा अर्जासोबत दिलेली माहिती अथवा खोटी कागदपत्रे सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी कोणत्याही टप्यावर किंवा निवड झाल्या नंतरही रदद करण्यांत येईल. निवड झालेल्या उमेदवारांच्या नियुक्तीवेळी मुळ कागदपत्रे सादर करणे बंधनकारक राहिल. अन्यथा निवड प्रक्रियेतून अपात्र ठरविण्यांत येईल. एखादया उमेदवाराने त्याच्या निवडीसाठी प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष दबाव आणल्यास त्या उमेदवारास निवड प्रक्रियेतून बाद करण्यांत येईल. तसेच प्रचलित नियम व कायदा यानुसार कारवाई करण्यात येईल. |
| 13 | मानधन | अंगणवाडी मदतनीस यांना शासन निर्धारित दरमहा एकत्रित मानधन देय राहिल. शासकिय नियमानुसार एकत्रित मानधनात वेळोवेळी करण्यांत आलेली वाढ नियमानुसार अनुज्ञेय राहिल. मात्र मानधना व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे भत्ते व सवलती अनुज्ञेय राहणार नाही. |
| 14 | प्रतिक्षा यादी बाबत माहिती | प्रतिक्षा यादी एकुण प्राप्त झालेल्या गुणांच्या आधारावर उमेदवारांची प्रतिक्षा यादी ठेवण्यांत येईल. कांही कारणामुळे उमेदवार नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासुन 30 दिवसात रुजू न झाल्यास किंवा त्यास अपात्र ठरविण्यांत आल्यास प्रतिक्षा यादीतील गुणानुक्रमानुसार उमेदवारास नियमानुसार नियुक्ती देण्यांत येईल. व सदर क्षेत्रात अंगणवाडी मदतनीस यांनी राजीनामा दिल्यास अथवा अन्य कारणास्तव पद रिक्त झाले अथवा नविन अंगणवाडी मंजुर झाली तर प्रतिक्षा यदितील उमेदवारास गुणानुक्रमानुसार नियुक्ती देण्यांत येईल. सदर प्रतिक्षा यादी निकाल जाहिर झाल्यापासुन एक वर्षापर्यंत वैध राहील. |
| 15 | अपिल | अंगणवाडी मदतनीस या मानधनी पदावरील घोषित निवडी संदर्भात कोणत्याही उमेदवाराची तक्रार असल्यास निवड यादी घोषित झाल्यापासुन 30 दिवसाचे आत विभागीय उपआयुक्त, महिला व बाल विकास, छत्रपती संभाजी नगर यांचेकडे तक्रार करता येईल. मा. विभागिय उपआयुक्त, महिला व बाल विकास, विभाग छ. संभाजी नगर यांनी दिलेल्या निर्णयामुळे तक्रारदाराचे समाधान झाले नसल्यास आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांचेकडे पुढील 60 दिवसात अपिल दाखल करता येईल. |
| 16 | सेवा समाप्ती व वयाची अट | दिनांक 30.11.2018 च्या शासन निर्णयानुसार नियुक्त होणा-या अंगणवाडी मदतनीस यांची सेवा वयाची 60 वर्ष पुर्ण होईपर्यत किंवा त्या शारिरीकदृष्टया काम करण्यास सक्षम नसल्यास यापैकी जे आधी घडेल तापर्यत सेवा सुरु ठेवण्यात येईल. |
| 17 | कागदपत्र पडताळणी | गुणानुक्रमानुसार ज्या उमेदवाराचे निवड होईल त्या उमेदवाराने अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांच्या मुळ कागदपत्रांची उमेदवारास हजर करुन घेण्यापुर्वी पडताळणी / तपासणी केली जाईल. ज्या प्रकरणी कोणत्याही प्रकारची शंका असेल असे प्रकरणे वरिष्ठ अधिका-यांच्या निदर्शनास आणूण दिले जाईल. निवड झाल्यानंतर खोटे प्रमाणपत्र सादर केल्याचे निदर्शनास आल्यास झालेली निवड रदद करण्यांत येईल. तसेच कामावर रुजु करुन घेतले असेल तर कामावरुन कमी करण्यांत येईल. जाहिरातीमधिल कोणत्याही मुदयाबाबत साशंकता किंवा संदिग्धता निर्माण झाल्यास संबंधित शासन निर्णयातील तरतुदी अंतिम राहतील. |
| 18 | भरती पत्रव्यवहार | भरती प्रक्रियेसंबधी अर्जदारास कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. सर्व सुचना जाहिरातीमधील अटी व शर्तीप्रमाणे असुन वेळोवेळी देण्यांत येणा-या सुचना कार्यालयीन नोटिस बोर्डवर लावण्यांत येतील. |
| 19 | महत्वाची सुचना | भरती प्रक्रिया शासन निर्णय 02.02.2023 व महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्रमांक-एबावि-2022/प्रक्र 94/का.6 दिनांक 30.01.2025 अन्वये राबविण्यांत येणार असुन निवड व नियुक्ती गुणवत्ता यादीनुसार करण्यांत येणार आहे. करिता उमेदवारांनी कोणत्याही भुलथापांना अथवा अफवांना बळी पडु नये. तसेच कोणाशीही आर्थिक व्यवहार करु नये. कोणतेही व्यक्ती नोकरी लावून देण्याच्या अमिषाने पैशाची मागणी करीत असल्यास तात्काळ पोलिस खात्यास संपर्क साधावा. |
| 20 | अर्जाचा कालावधी | अर्ज सादर करावयाचा कालावधी दि. 16.04.2025 ते दिनांक. 30/04/2025 सायंकाळी 05.00 पर्यत राहिल. या दिनांक व वेळेनंतर कोणत्याही प्रकारचे दस्ताऐवज स्विकारले जाणार नाही. अंतिम दिनांकानंतर आलेल्या किंवा डाकेने / पोष्टामुळे विलंब झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. तसेच अर्ज भरण्याच्या अंतिम मुदतीनंतर कोणतीही पुरवणी कागदपत्रे स्विकारली जाणार नाही याची नोंद घ्यावी. |
| 21 | अर्ज मिळण्याचे व स्विकृतीचे ठिकाण व पत्ता | बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) जिल्हा लातूर त्रिमुर्ती भवन, बॅक ऑफ इंडियाच्या वर, पहिला मजला, उदय पेट्रोलपंप जवळ, बार्शी रोड लातूर पिन कोड - ४१३५१२ |

Child Development Project Officer • Urban (Dist) Latur

बाल विकास प्रकल्प अधिकारी
(नागरी) जिल्हा लातूर

# बाल विकास प्रकल्प अधिकारी, नागरी जिल्हा लातूर

Child Development Project Officer • Urban (Dist) Latur

## अंगणवाडी मदतनीस (मानधनी) पदासाठी नमुना अर्ज सन २०२५-२६

**कार्यालयीन उपयोगासाठी**

| | |
|---|---|
| आवक क्रमांक | |
| दिनांक | |
| नगर परिषद/ नगर पंचायतचे नाव | |

फोटो
( अलिकडील कालावधीतील काढलेला रंगीत फोटो लावावा व **स्वाक्षरी** करावी)

**प्रति,**
मा. बाल विकास प्रकल्प अधिकारी
(नागरी) जिल्हा लातूर
त्रिमुर्ती भवन, बॅंक ऑफ इंडियाच्या वर, पहिला मजला, उदय पेट्रोलपंप जवळ, बार्शी रोड लातूर पिन कोड - ४१३५१२

मी खाली सही करणार लातूर जिल्हयातील खाली नमुद न.प. कार्यक्षेत्रातील स्थानिक रहिवाशी असुन अंगणवाडी मदतनीस या पदासाठी सरळ सेवेने नियूक्ती करिता अर्ज सादर करीत आहे, त्यासाठी माझी संपुर्ण माहिती खालील प्रमाणे आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | नगरपरिषद/नगरपंचायतचे नांव | ____________________ | | |
| २ | ज्या पदाकरीता अर्ज करत आहेत त्या पदाचे नाव | **अंगणवाडी मदतनीस** | | |
| ३ | विवाहित / अविवाहित | | | |
| | अर्जदार विवाहित असेल तर विवाह झाल्याची तारीख | | | |
| ४ | उमेदवाराचे विवाहापुर्वीचे संपुर्ण नांव (SSC/HSC प्रमाणपत्रा प्रमाणे) | ------------------------------------------------ | | |
| ५ | उमेदवाराचे विवाहानंतरचे संपूर्ण नांव | ------------------------------------------------ | | |
| ६ | संपुर्ण पत्ता व भ्रमणध्वनी क्रमांक | ------------------------------------------------<br>------------------------------------------------<br>भ्रमणध्वनी क्रमांक.------------------------------------ | | |
| ७ | अ) जन्म दिनांक (SSC प्रमाणपत्रा प्रमाणे)<br>ब) जाहिरात प्रसिध्द करण्याच्या अंतिम तारखेस उमेदवाराचे वय | दिनांक / /<br>दिनांक.३०.०४.२०२५ रोजी वय वर्ष----------महिने--------- दिवस --------- | | |
| ८ | धर्म | | | |
| ९ | जात / पोटजात | | प्रवर्ग | |
| १० | उमेदवार आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील आहे काय? (होय/नाही) असल्यास प्रमाणपत्राची सत्यप्रत जोडावी | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ११ | उमेदवार विधवा आहे काय? (होय/नाही)<br>असल्यास विधवा प्रमाणपत्राची / पतीचे मृत्य प्रमाणपत्र जोडावे | | | |
| १२ | उमेदवार घटस्फोटीत आहे काय? (होय/ नाही) | | | |
| १३ | उमेदवार घटस्फोटीत असल्यास सक्षम प्राधिकारी / न्यायालयीन आदेशाची प्रत जोडावी | | | |
| १४ | उमेदवार अनाथ आहे काय? (होय/नाही)<br>असल्यास अनाथ प्रमाणपत्र जोडावे | | | |
| १५ | उमेदवार स्थानिक रहिवासी आहे काय? (होय/नाही)<br>असल्यास जाहिराती नुसार तहसिलदार यांचे रहिवासी प्रमाणपत्राची सत्यप्रत जोडावी | | | |
| १६ | उमेदवारास आज रोजी हयात असलेल्या अपत्यांची संख्या | मुले- | मुली- | एकुण अपत्ये- |

| १७ | शैक्षणिक अर्हता | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अक्र | शिक्षण | उत्तीर्ण वर्ष | बोर्डाचे / विदयापीठाचे नांव | प्राप्त गुण | टक्केवारी |
| १ | इयत्ता दहावी | | | | |
| २ | इयत्ता बारावी | | | | |
| ३ | पदवी | | | | |
| ४ | पदव्युत्तर पदवी | | | | |
| ५ | डी.एड | | | | |
| ६ | बी.एड | | | | |
| ७ | शासनमान्य संस्थेचे संगणक प्रमाणपत्र (MS CIT/ समकक्ष) | | | | |
| ८ | इतर | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

| १८ | अंगणवाडी सेविका / मिनी अंगणवाडी सेविका / मदतनीस पदाचा अनुभव असल्यास अनुभवाचा तपशिल (सोबत मुळ प्रमाणपत्र जोडावे.) | | |
|---|---|---|---|
| | शासनमान्य अंगणवाडीचे नाव व पत्ता | पद | कालावधी (पासुन,पर्यंत) |
| | | | |

| १९ | अर्जदाराने अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडावे. अर्जदाराने जोडलेल्या कागदपत्रापुढे होय व नसलेल्यापुढे नाही लिहावे | |
|---|---|---|
| अक्र | तपशिल | होय / नाही |
| १ | एसएससी गुणपत्रक /प्रमाणपत्र | |
| २ | १२ वी गुणपत्रक / प्रमाणपत्र | |
| ३ | पदवी गुणपत्रक / प्रमाणपत्र | |
| ४ | पदव्युत्तर पदवी गुणपत्रक / प्रमाणपत्र | |
| ५ | डी.एड. गुणपत्रक / प्रमाणपत्र | |
| ६ | बी.एड. गुणपत्रक / प्रमाणपत्र | |
| ७ | शासन मान्य संस्थेचे संगणक परिक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र | |

| | | |
|---|---|---|
| ८ | तहसिलदार यांचे रहिवासी /अधिवास प्रमाणपत्राची साक्षांकित **प्रत** | |
| ९ | विधवा **प्रमाणपत्र** /पतीचे **मृत्यु प्रमाणपत्र** | |
| १० | **अनाथ प्रमाणपत्र** | |
| ११ | तहसिलदार /उपविभागीय अधिकारी यांचे जातीचे **प्रमाणपत्र** | |
| १२ | आर्थिक **दृष्टया** दुर्बल **घटक प्रमाणपत्र** | |
| १३ | अंगणवाडी सेविका / मिनी अंगणवाडी सेविका / मदतनीस **अनुभव प्रमाणपत्र** | |
| १४ | **लहान** कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र **नमुना** (अ) प्रतिज्ञापन **व** प्रतिज्ञापत्र परिशिष्ट (ब) | |
| १५ | अर्जासोबत जोडलेली सर्व कागण्दपत्रे **व प्रमाणपत्र** खरी **व** वैध मार्गाने मिळवीली **असल्याबाबतचे स्वय घोषणापत्र प्रपत्र** (अ) | |
| १६ | **स्वयं** साक्षांकनासाठी स्वयंघोषणा **पत्र प्रपत्र** (ब) | |
| १७ | इतर | |
| | | |
| | | |

वरीलप्रमाणे दिलेली माहिती सत्य आहे. वरील पैकी कोणतीही माहिती अथवा कागदपत्रे खोटी असल्याचे आढळुन आल्यास माझा अर्ज सरळ सेवेने नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्पावर बाद करण्यांत येईल याची मला जाणीव आहे. तसेच नियुक्ती झाल्यावरही खोटी कागदपत्रे आढळुन आल्यास माझी अंगणवाडी मदतनीस पदावरील सरळ सेवेने नियुक्ती रदद करण्यांत येईल व त्यास माझी कांहीही हरकत नसेल. प्रचलीत कायदे व नियमानुसार कारवाईस मी पात्र ठरेल याची मला पुर्ण जाणीव आहे. तसेच शासन निर्णयातील सरळ सेवेने नियुक्ती बाबतीत नमुद अटी व शर्ती मी पुर्णपणे वाचलेल्या असून त्या सर्व मला मान्य आहेत.

**ठिकाण :**
**दिनांक :**

------------------------------------
------------------------------------
**(उमेदवाराचे संपुर्ण नाव व सही)**



प्रतिज्ञापत्र

नमुना (अ)

(नियम ४ पहा)

मी श्रीमती / कुमारी --------------------------------------------------------------------------श्री-------------------------------- ------------------------ यांची मुलगी/पत्नी, वय ------------- वर्ष राहणार------------------------ जिल्हा लातूर याव्दारे पुढील प्रमाणे असे जाहीर करते की,

१. मी अंगणवाडी मदतनीस या पदासाठी सरळ सेवेने अर्ज दाखल केलेला आहे.

२. आज रोजी मला----------------- (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८.०३.२००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या----------------- आहे (असल्यास, जन्म दिनांक नमुद करावा)

१. ------------------------------------------------------------------------------------------------

२.------------------------------------------------------------------------------------------------

३.------------------------------------------------------------------------------------------------

४. हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८.०३.२००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल. याची मला जाणीव आहे.

ठिकाण :

दिनांक :

**(उमेदवाराचे संपुर्ण नाव व सही)**

संपुर्ण नाव -

--------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**परिशिष्ठ ब**

**प्रतिज्ञापत्र**

मी श्रीमती / कुमारी --------------------------------------------------------------------------------------------------------- श्री------------------------------------------------------ यांचा / यांची मुलगी/पत्नी, वय ----------- वर्ष राहणार----------------

जिल्हा लातूर याव्दारे पुढील प्रमाणे असे जाहीर करते की,

१. मी अंगणवाडी मदतनीस या पदासाठी सरळ सेवेने अर्ज दाखल केलेला आहे.

२. आज रोजी मला खालील प्रमाणे मुले आहेत.

| अक्र | मुलाचे / मुलीचे नांव | जन्मतारीख | वय |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

३. हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल किंवा भविष्यात दोनपेक्षा अधिक मुले झाल्यास, मानधनी पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास किंवा कमी करण्यास पात्र होईल, याची मला जाणीव आहे.

४. मला दोनपेक्षा जास्त मुले होणार नाहीत यासाठी मी कुटुंबनियोजन करुन घेण्याची प्रतिज्ञा करते.

ठिकाण :

दिनांक :

Child Development Project Officer Urban (Dist) Latur

सत्यमेव जयते

**(उमेदवाराचे संपुर्ण नाव व सही)**

संपुर्ण नाव -

--------------------------------------------

प्रपत्र-अ

स्वयंघोषणापत्र

मी --------------------------------------------------------------------- श्री-------------------------------------------------
यांचा मुलगा / मुलगी वय----------------- वर्ष, आधार क्रमांक (असल्यास) -------------------------------------------------
याव्दारे घोषित करतो / करते की, वरील सर्व माहिती माझ्या व्यक्तीगत माहिती व समजूतीनुसार खरी आहे. सदर माहिती खोटी आढळून आल्यास, भारतीय दंड संहिता अन्वये आणि / किंवा संबंधित कायदयानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण :

दिनांक :

उमेदवाराची सही

संपुर्ण नाव -

--------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------------------------------

प्रपत्र-ब

स्वयं साक्षांकनासाठी स्वंय घोषणापत्र

मी --------------------------------------------------------------------- श्री-------------------------------------------------
यांचा मुलगा / मुलगी वय----------------- वर्ष, आधार क्रमांक (असल्यास) -------------------------------------------------
व्यवसाय -------------------------------- याव्दारे घोषित करते की, मी स्वंय साक्षांकित केलेल्या प्रती या मुळ कागदपत्रांच्याच सत्य प्रती आहेत. त्या खोटया असल्याचे आढळून आल्यास, भारतीय दंड संहिता अन्वये आणि / किंवा संबंधित कायदयानुसार माझ्यावर खटला भरला जाईल व त्यानुसार मी शिक्षेस पात्र राहीन याची मला पूर्ण जाणीव आहे.

ठिकाण :

दिनांक :

उमेदवाराची सही

संपुर्ण नाव -

--------------------------------------------

Child Development Project Officer
Urban (Dist) Latur

## बाल विकास प्रकल्प अधिकारी, नागरी जिल्हा लातूर
## अर्ज पोहच पावती

उमेदवाराचे नांव ------------------------------------------------ पद ---------------- अर्ज प्राप्त दिनांक -------------

अर्ज आवक क्रमांक ------------------ न.प. क्षेत्राचे नांव --------------------

| अक्र | तपशिल | होय / नाही (कार्यालयीन वापरासाठी) |
|---|---|---|
| १ | एसएससी प्रमाणपत्र / टि.सी / जन्म प्रमाणपत्र | |
| २ | १२ वी गुणपत्रक / प्रमाणपत्र | |
| ३ | पदवी गुणपत्रक / प्रमाणपत्र | |
| ४ | पदव्युत्तर पदवी गुणपत्रक / प्रमाणपत्र | |
| ५ | डी.एड. गुणपत्रक / प्रमाणपत्र | |
| ६ | बी.एड. गुणपत्रक / प्रमाणपत्र | |
| ७ | उर्दु भाषेचे शैक्षणिक कागदपत्र | |
| ८ | शासन मान्य संस्थेचे संगणक परिक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र | |
| ९ | तहसिलदार / मुख्याधिकारी यांचे रहिवासी प्रमाणपत्र / सक्षम अधिकारी यांचे अधिवास (Domicile) प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत | |
| १० | विधवा प्रमाणपत्र / पतीचे मृत्यू प्रमाणपत्र | |
| ११ | अनाथ प्रमाणपत्र | |
| १२ | तहसिलदार / उपविभागीय अधिकारी यांचे जातीचे प्रमाणपत्र | |
| १३ | आर्थिकदृष्टया दुर्बलघटक प्रमाणपत्र | |
| १४ | अंगणवाडी सेविका / मदतनीस / मिनी अंगणवाडी सेविका अनुभव प्रमाणपत्र | |
| १५ | लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र नमुना (अ) प्रतिज्ञापन व प्रतिज्ञापत्र परिशिष्ट (ब) | |
| १६ | अर्जासोबत जोडलेली सर्व कागदपत्र व प्रमाणपत्र खरी व वैध मार्गाने मिळविली असल्याबाबतचे स्वंय घोषणापत्र प्रपत्र (अ) | |
| १७ | स्वंय साक्षांकनासाठी स्वंय घोषणा पत्र प्रपत्र (ब) | |
| १८ | इतर | |
| | | |
| | | |
| | | |

Child Development Project Officer • Urban (Dist) Latur

स्वाक्षरी

अर्ज स्विकारणा-याचे नांव------------------

पद---------------------------------------